# डिजीटल ग्रंथालय आणि कोविड–19 चा काळ

**डॉ. पफुल्ल कडु**
**भगवंतराव पाटील महाविद्यालय**
**परतवाडा जि.अमरावती**
Email: prafulkadu101@gmail.com

---

**प्रस्तावना :**

आजचे युग हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग आहे. यामुळे प्रत्येक क्षेत्रात या तंत्रज्ञानाने प्रगती केली आहे. ग्रंथालय सुध्दा यापासुन वेगळे राहले नाही. शिक्षण क्षेत्रात ग्रंथालयाचे योगदान खूप महत्त्वपूर्ण असते व ग्रंथालय विभाग आजपर्यंत आपले योगदान देत आहे. ज्ञानाचा साठा हा पुस्तकांच्या रुपात ग्रंथालयात उपलब्ध असतो. ग्रंथालयाशिवाय विद्यार्थ्यांची शिक्षण पूर्ण होणे कठीण असते. कोविड-१९ काळात कोरोनाव्हायरसमुळे सर्व क्षेत्र प्रभावित होऊन बंद पडले व यासोबतच महाविद्यालय ही बंद पडली. महाविद्यालय बंद असल्यामुळे महाविद्यालयातील ग्रंथालय पण बंद होती. विद्यार्थ्यांचे शिक्षण हे ऑनलाइन वर्गाद्वारे चालू होते, पण त्याला अभ्यास करण्यासाठी पुस्तकांची समस्या किंवा अभ्यासाच्या सामग्रीची कमतरता जाणवत होती. ही समस्या ग्रंथालयाविभागाच्या डिजिटल ग्रंथालयामुळे दूर होऊन विद्यार्थ्यांना वाचन सामग्री त्यांच्या मोबाईलवर, लॅपटॉपवर किंवा संगणकावर आभासी स्वरुपात उपलब्ध झाली व यामुळे ते आपल्या अभ्यासक्रमाचा सखोल अभ्यास करू शकले.

**संशोधन पद्धती :**

वरील संशोधन पेपर तयार करतांना स्वनिरीक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. सोबतच कच्ची माहिती गोळा करण्यासाठी विविध आभासी साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे. उदा. गुगल वरील वेबसाईट, युट्युबवरील व्हिडियोज, आभासी वर्तमानपत्रे, आभासी जर्नल्स इत्यादी.

**उदिष्टे :**

1. डिजिटल ग्रंथालयाविषयी o कोविड-१९ चर्चा करणे.
2. डिजिटल ग्रंथालयाची विद्यार्थी जीवनातील भूमिकेविषयी चर्चा करणे.
3. डिजिटल ग्रंथालयाच्या फायद्याविषयी चर्चा करणे.
4. डिजिटल ग्रंथालयातील साधनांविषयी चर्चा करणे.

**डिजिटल ग्रंथालयाची भूमिका :**

कोविड-१९ काळात सर्वीकडे भीतीदायक वातावरण निर्माण झाले होते. कोरोनाव्हायरस आपले पाय पसरत होता व कोरोनाव्हायरसमुळे विविध क्षेत्रे प्रभावित झाले होते. या व्हायरसचे लागण होण्याचे प्रमाण ही वाढत होते. ही परिस्थिती पाहता सरकारने लॅाकडाऊनचा निर्णय घेतला होता. लॅाकडाऊनमुळे सर्व क्षेत्र बंद करण्यात आले होते. यामुळे शिक्षण क्षेत्रही बंद पडले होते. शिक्षण क्षेत्राला सुरू करण्याचा उपाय म्हणून ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला होता. ऑनलाईन शिक्षणाच्या पर्यायामुळे विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचण्याचा प्रश्न तर मिटला पण अभ्यासासाठी लागणाऱ्या साहित्याचा प्रश्न बाकी होता. कारण शिकवणी वर्ग तर

विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असतातच पण त्यासोबतच विद्यार्थ्यांचे त्या-त्या विषयाचे सखोल वाचन पण महत्त्वाचे असते. पण वाचनासाठी विद्यार्थी पुस्तके आणेल कोठून कारण महाविद्यालयातील बंद होती व पुस्तक मार्केट पण बंद होती. ही समस्या डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित ग्रंथालयाने डिजिटल ग्रंथालयाने दूर केली.

विद्यार्थ्याला घरांमधून कुठेही न जाता त्यांच्या मोबाईलवर, लॅपटॉपवर किंवा संगणकावर आभासी स्वरूपात पुस्तके उपलब्ध करून दिली. यामुळे विद्यार्थ्याला कोविड-१९ वातावरणात जाण्याचे काम पडले नाही. तसेच याचा फायदा असा झाला की, त्याला डिजिटल ग्रंथालयातील पुस्तकांचे वाचन करण्यासाठी विशिष्ट वेळेचे व ठिकाणाचे बंधन राहिले नाही. तो त्याच्या सोयीस्कर वेळेप्रमाणे व ठिकाणाप्रमाणे पुस्तकांचे वाचन करू शकत होता. तसेच डिजिटल ग्रंथालयामुळे त्याला पारंपारिक ग्रंथालयासारखे पुस्तकांचे वाचन करण्यासाठी पुस्तकांच्या संख्येचे बंधन ही राहिले नाही. त्याला जे पुस्तक वाचायचे आहे, ते तो विविध डिजिटल ग्रंथालयाच्या वेबसाईटवरून किंवा ॲपवरून सहजरीत्या वाचू शकत होता. डिजिटल ग्रंथालयामुळे विद्यार्थ्यांची वाचनासाठीच्या पुस्तकांची किंवा वाचन सामग्रीची समस्या दूर झाली व तो ऑनलाईन शिकवणी वर्गासोबतच त्या विषयाचे वाचन व आपला अभ्यासक्रम पूर्ण करू शकला.

डिजिटल ग्रंथालयाचा उपयोग हा इंटरनेटच्या सहाय्याने घेता येतो. याचा उपयोग करण्यासाठी मोबाईलमध्ये, लॅपटॉपमध्ये किंवा संगणकामध्ये इंटरनेट सेवा असणे गरजेचे असते. तसेच डिजिटल ग्रंथालयाचा वापर करण्यासाठी त्या गुगलवर उपलब्ध असलेल्या वेबसाईटचा किंवा गुगल प्लेस्टोरवर उपलब्ध असलेल्या ॲप्सचा आधार घ्यावा लागतो. गुगलवर व गुगल प्लेस्टोरवर विविध वेबसाईट व ॲप्स उपलब्ध आहेत. त्यातील काही महत्त्वाच्या वेबसाईट व ॲप्सचे नावे खालीलप्रमाणे आहेत.

**1. National Digital Library of India :**

NDLI हा एक या पुस्तकांचा सोर्स आहे, जो घराबाहेर न जाता व आपल्या मोबाईलवर, लॅपटॉपवर किंवा संगणकावर विनामूल्य असंख्य पुस्तके वाचण्याची संधी प्रदान करतो. तसेच यात दहा भाषांमध्ये पुस्तके उपलब्ध आहेत. NDLI ही एक वेबसाईट व ॲप या दोन्ही माध्यमांमधून उपलब्ध आहे. या पोर्टलवर नोंदणी केल्यावर विनामूल्य पुस्तके वाचता येतात व या पोर्टलवर नोंदणी करणे हे मोफत आहे. हे ई-ग्रंथालयाचे पोर्टल भारत सरकारच्या शिक्षा मंत्रालयाच्या अधीन राहून कार्य करते. तसेच NDLI हा भारत सरकारचा विनामूल्य पुस्तकांचा शोर्स म्हणून एक उपक्रम आहे. या पोर्टलवर विविध विषयांसंबंधी पुस्तके उपलब्ध आहेत. तसेच व्हिडिओ स्वरूपात रेकॉर्ड केलेले वर्ग सुद्धा उपलब्ध आहेत. विद्यार्थी आपल्या मोबाईलवर, लॅपटॉपवर किंवा संगणकावर घराबाहेर न पडता विनामूल्य त्याच्या विषयासंबंधीचे व इतर पुस्तके वाचू शकतो व सखोल ज्ञान प्राप्त करू शकतो.

**2. Open Library :**

Open Library हे पण एक मोफत पुस्तके वाचण्याचे साधन आहे. जे वेबसाईट आणि ॲप या दोन्ही पर्यायांमध्ये उपलब्ध आहे. या ग्रंथालयातील पुस्तके वाचण्यासाठी आधी या पोर्टलवर नोंदणी करावी लागते. जी मोफत करता येते. नोंदणी झाल्यावर या ई-ग्रंथालयातील पुस्तके आपण Barrow करून विनामूल्य मोबाईलवर, लॅपटॉपवर किंवा संगणकावर आपल्या वेळेनुसार व उचित ठिकाणानुसार पुस्तके वाचू शकता

अशाप्रकारे डिजिटल ग्रंथालय आहेत, जे आपले महत्वपूर्ण योगदान शिक्षण क्षेत्रात देत आहेत आणि कोविड-१९ काळात देखील आपले महत्वपूर्ण योगदान दिले.. वरील प्रमाणेच आणखीन काही माध्यमे आहेत जे

डिजिटल ग्रंथालयाच्या स्वरूपात उपलब्ध आहेत जसे IGNOU E-Content App, E-Granthalaya App, Global Digital Library, eGyankosh इत्यादी. हे गुगलवर शोधल्यास सहजरीत्या दिसतील.

**निष्कर्ष :**

ग्रंथालय क्षेत्रात खुप मोठया संस्था कार्यरत आहे. त्यामुळे बरिचषी माहिती डिजीटल स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे काम त्यांच्याद्वारे करण्यात आले. शिक्षण क्षेत्रात ग्रंथालयाचा एक महत्त्वपूर्ण सहभाग आहे. ज्ञान पोहोचण्याची काम ग्रंथालय विभाग खूप निष्ठेने करत आहे. कोविड-१९ काळात ग्रंथालय बंद असताना ही ग्रंथालय विभागाने डिजिटल ग्रंथालयाच्यामार्फत विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञान पोहोचण्याची काम पार पाडले आहे. कोविड-१९ काळात विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी घराबाहेर जाऊ शकत नव्हता व महाविद्यालये सुरू करण्याची परवानगी नव्हती. तेव्हा ऑनलाईन शिक्षण हा पर्याय उत्तम वाटला व विद्यार्थ्यांचे वर्ग हे ऑनलाइन स्वरूपात सुरु झाले. परंतु वर्गात त्या विषयाविषयी शिकवल्यानंतर त्या विषयासंबंधी सखोल ज्ञान प्राप्त करण्यासाठी वाचनाची आवश्यकता असते आणि वाचनासाठी पुस्तकांची आवश्यकता असते. अशा वेळेस ग्रंथालयाची कमतरता विद्यार्थ्यांना जाणवली. पुस्तके ही मार्केटमध्येही उपलब्ध असतात पण प्रत्येक विद्यार्थी ही महागडी पुस्तके विकत घेऊ शकत नाही. अशा परिस्थितीत डिजिटल ग्रंथालयाच्या माध्यमातून पुस्तके पोहोचवल्या गेलीत. ते मग व्हाट्सॲपद्वारे असो, गूगल क्लासरूमद्वारे असो, विविध ॲप्सद्वारे असो किंवा विविध वेबसाईटद्वारे असो विद्यार्थ्यांपर्यंत वाचन सामग्री पोहोचली. याद्वारे विद्यार्थी आपल्या मोबाईलवर, लॅपटॉपवर किंवा संगणकावर डिजिटल ग्रंथालयातील पुस्तके वाचू शकला व आपला अभ्यास पूर्ण करू शकला.

अशाप्रकारे कोविड-१९ दरम्यान ग्रंथालय विभागाने डिजिटल ग्रंथालयाच्या मार्फत आपली भूमिका पार पाडली.

**संदर्भ ग्रंथसूची** :


- https://maharashtratimes.com/maharashtra/mumbai-news/many-publication-have-launched-apps-for-attract-readers-in-corona-period/articleshow/78665669.cms
- https://www.thebridgechronicle.com/opinion/covid-19-role-library-during-pandemic-49537
- https://acerforeducation.acer.com/education-trends/blended-learning/digital-libraries-in-a-blended-learning-environment/
- http://library.ddn.upes.ac.in:8081/upeslib/covid19_initiative.pdf
- https://www.teriin.org/event/role-digital-libraries-and-knowledge-collaboration-advance-sustainable-mobility-research
- https://www.springernature.com/gp/librarians/the-link/blog/blogposts-news-initiatives/the-effects-of-covid-19-on-libraries/18507278

- https://ndlproject.iitkgp.ac.in/news/media-coverage/covid-19-put-brake-academic-activity-digital-libraries-can-ensure-continuity
- https://ils.unc.edu/~march/cacm95/main.html
- https://openlibrary.org/
- https://ndl.iitkgp.ac.in/
- https://egranthalaya.nic.in/
- https://digitallibrary.io/